सकाळ

# मुंढव्यात सायबर सुरक्षेचे धडे

**मुंढवा, ता. २९ :** ऑनलाइन फसवणूक टाळण्यासाठी विद्यार्थ्यांनी डिजिटल युगात सतर्क राहणे काळाची गरज आहे. याच उद्देशाने येथील लोणकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात क्विक हील फाउंडेशनच्या वतीने 'सायबर सुरक्षा' जनजागृती सत्र घेण्यात आले.

हडपसर येथील अण्णासाहेब मगर महाविद्यालयाच्या 'सायबर वॉरियर्स'नी या वेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ऑनलाइन फसवणूक, मजबूत पासवर्डचे महत्त्व, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर आणि डिजिटल गोपनीयतेबाबत या वेळी सविस्तर माहिती देण्यात आली. प्रत्यक्ष उदाहरणे आणि प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून संशयास्पद लिंक, बनावट संदेश, ओटीपी फसवणूक यांपासून स्वतःचे संरक्षण कसे करावे, याचे धडे विद्यार्थ्यांना मिळाले. विद्यार्थ्यांनीही विविध प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले.

जबाबदार डिजिटल नागरिक घडविणे आणि सुरक्षित डिजिटल भारताच्या निर्मितीस हातभार लावणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे प्राचार्या अनिता शिंदे यांनी सांगितले. शिक्षक समन्वयकांनी या सत्राचे नियोजन केले होते.

Pune, Hadapsar-Today
30/07/2026 Page No. 5